# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स २५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/खेलोइंडिया/८२८ दिनांक: १२ डिसेंबर, २०१८.

**तातडीचे व अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य व शारीरिक शिक्षण संचालक,
संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,
पुणे शहर क्रीडा समिती, पुणे

विषय : 'खेलो इंडिया युथ गेम्स–२०१९' मधील महाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग.
संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासननिर्णय क्र. केआयपी–२३१८/प्र.क्र.१९७/क्रीयुसे–२, दि. ०६/१०/२०१८.
२. खेलो इंडिया क्रीस्पर्धा दि. १२/११/२०१८.

महोदय,

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स–२०१९ शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे दि. ०८ ते २० जानेवारी, २०१९ या कालावधीत आयोजित करण्याचे निश्चित झालेले आहे. खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत १८ खेळांच्या स्पर्धा १७ वर्षाखालील व २१ वर्षाखालील मुले व मुली या गटात होणार असून सुमारे १२,५०० खेळाडू, तांत्रिक अधिकारी व स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेच्या नियोजनाकरिता आपल्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक तसेच स्वयंसेवक म्हणून आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी करून घ्यावेत. याकरिता खाली नमूद केलेल्या संकेतस्थळावर सहभागी स्वयंसेवकांची नावनोंदणी दि. १६ डिसेंबर, २०१८ पर्यंत करणे आवश्यक आहे. आयोजकांसमवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सहभागी स्वयंसेवकांना आयोजकांमार्फत दि. ०८ ते २० जानेवारी, २०१९ दरम्यान नाष्टा, भोजन व प्रत्येकी प्रतीदिन रू. २५० तसेच दोन टी–शर्ट व एक ट्रॅकसुट देण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्याचे विवरण अत्यावश्यक आहे.

Online नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि. १६ डिसेंबर, २०१८ पर्यंत विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण कार्यालयास directorsports@unipune.ac.in या मेलावर Khelo India Youth Games Vol. List या विषयासह पाठवावी.

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ.

१. नावनोंदणी लिंक : https;//kheloindia.sportz.io/volunteers/login
२. लॉगीन : SAVITRIBAI_vol, पासवार्ड : SAVITRIBAI_vol_123

Scanned by CamScanner